**इयत्ता बारावी प्रथम सत्र परीक्षा**

**विषय : भूगोल**

**गुण : 50**

**वेळ : 2.30 तास**

---

**सूचना :**

1. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
2. प्रश्नांची उत्तरे लिहिताना आवश्यक तेथे योग्य आकृत्या / आलेख काढा.
3. रंगीत पेन्सिलचा वापर करण्यास परवानगी आहे.
4. योग्य तेथे नकाशा स्टेंसिलचा वापर करावा.
5. उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.
6. आलेख पुरवणी व नकाशा पुरवणी मूळ उत्तरपत्रिकेस जोडावी.

---

**प्रश्न 1. दिलेल्या सूचनेनुसार उप-प्रश्न सोडवा : (13)**

**(अ) खालील साखळी पूर्ण करून लिहा : (4)**

| अ | ब | क |
|---|---|---|
| अंटार्क्टिका खंड | कायम बर्फाच्छादित प्रदेश | कायम निवासी लोकसंख्या नाही |
| लाकूडतोड | समशीतोष्ण सूचीपर्णी वने | व्यापारी तत्त्वावर लाकूडतोड |
| सखोल उदरनिर्वाहक शेती | शेतीचा आकार लहान | तांदूळ हे प्रमुख पीक |
| साखर कारखाना | वजन घटणारा कच्चा माल | ऊस उत्पादक प्रदेश |

**(ब) अचूक घटक ओळखा : (3)**

**1. लोकसंख्या संक्रमणातील खालीलपैकी कमी वाढ दर्शविणारा टप्पा कोणता?**

अ) पहिला टप्पा

ब) तिसरा टप्पा

Proff Manojj Deshmukh

क) चौथा टप्पा

ड) पाचवा टप्पा

**2. समुद्रकिनारी प्रदेशात आढळणारा आकारानुसार वस्ती प्रकार:**

अ) आयताकृती वस्ती

ब) त्रिकोणी वस्ती

क) वर्तुळाकार वस्ती

ड) रेषीय वस्ती

**3. टुंड्रा प्रदेशातील शिकार व्यवसाय करणारी जमात:**

अ) एस्किमो

ब) पिग्मी

क) बोरा इंडियन

ड) सेंटीनल

**(क) अचूक सहसंबंध ओळखा : (3)**

**1. A: सुपीक मैदानी प्रदेशात दाट लोकवस्ती आढळते.**

**R: सुपीक मृदा ही शेतीसाठी उपयुक्त असते.**

अ) केवळ A बरोबर आहे.

ब) केवळ R बरोबर आहे.

क) A आणि R दोन्ही बरोबर आहेत आणि R हे A चे अचूक स्पष्टीकरण आहे.

ड) A आणि R दोन्ही बरोबर आहेत परंतु R हे A चे अचूक स्पष्टीकरण नाही.

**2. A: नगरे वाढतात, त्याबरोबर त्यांची कार्येही वाढतात.**

**R: एका नगराला केवळ एकच कार्य असू शकते.**

अ) केवळ A बरोबर आहे.

ब) केवळ R बरोबर आहे.

क) A आणि R दोन्ही बरोबर आहेत आणि R हे A चे अचूक स्पष्टीकरण आहे.

ड) A आणि R दोन्ही बरोबर आहेत परंतु R हे A चे अचूक स्पष्टीकरण नाही.

**3. A: लोकसंख्या मनोऱ्यात रुंद तळ बालकांची संख्या अधिक असल्याचे दर्शवितो.**

**R: लोकसंख्या मनोऱ्याचे रुंद शीर्ष वृद्धांची संख्या अधिक असल्याचे द्योतक आहे.**

अ) केवळ A बरोबर आहे.

ब) केवळ R बरोबर आहे.

क) A आणि R दोन्ही बरोबर आहेत आणि R हे A चे अचूक स्पष्टीकरण आहे.

ड) A आणि R दोन्ही बरोबर आहेत परंतु R हे A चे अचूक स्पष्टीकरण नाही.

Prof Manojj Deshmukh

**(ड) दिलेल्या सूचनेनुसार विधाने पूर्ण करा : (3)**

**1. चढत्या वयोरचनेनुसार योग्य क्रम लावा**

अ) प्रौढ

ब) बालक

क) वृद्ध

ड) युवा

**2. लोकसंख्या लाभांशाची योग्य व्याख्या खालीलपैकी कोणत्या विधानात योग्य प्रकारे दर्शवली आहे?**

अ) देशातील एकूण लोकसंख्येत बालकांची संख्या वाढणे.

ब) एखाद्या देशाच्या वयोरचनेत होणाऱ्या बदलामुळे त्याच्या अर्थव्यवस्थेत झालेली वाढ.

क) देशातील वृद्धांचे प्रमाण वाढून वैद्यकीय खर्च वाढणे.

ड) ग्रामीण भागातून शहरांकडे होणारे लोकसंख्येचे स्थलांतर.

**3. विषुववृत्तीय प्रदेशापासून ध्रुवीय प्रदेशांकडे वनांचा क्रम लावा.**

अ) उष्णकटिबंधीय पानझडी वने

ब) विषुववृत्तीय सदाहरित वने

क) समशीतोष्ण कटिबंधीय सूचीपर्णी वने

ड) समशीतोष्ण कटिबंधीय पानझडी वने

**प्रश्न 2. भौगोलिक कारणे लिहा (कोणतेही दोन) : (6)**

1. नगरांची वाढ ही भूमी उपयोजनाशी निगडित आहे.
2. स्थलांतर हे नेहमी कायमस्वरूपी असते असे नाही.
3. कॅनडामध्ये लाकूडतोड व्यवसायाचा विकास झाला आहे.

**प्रश्न 3. फरक स्पष्ट करा (कोणतेही दोन) : (6)**

1. स्थलांतराचे आकर्षक घटक आणि अपकर्षक घटक
2. ओसाड भूमी आणि बिगरशेती भूमी
3. केंद्रित वस्ती आणि विखुरलेली वस्ती

**प्रश्न 4. (अ) जगाच्या नकाशा आराखड्यात खालील बाबी योग्य चिन्हांच्या व सूचीच्या सहाय्याने दाखवा (कोणतेही चार) : (4)**

1. ऑस्ट्रेलियातील वाळवंटी प्रदेश

Prof Manojj Deshmukh

2. लोकसंख्या संक्रमण सिद्धांतातील पाचव्या टप्प्यातील देश (उदा. स्वीडन)
3. डॉगर बँक मत्स्यक्षेत्र
4. रॉकी पर्वतीय प्रदेश (उत्तर अमेरिकेतील भू-भाग)
5. अरबी समुद्रातील खाणकाम क्षेत्र (मुंबई हाय)

**प्रश्न 4. (ब) दिलेल्या आलेखाचे वाचन करून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा : (3)**




1. आकृतीत जागतिक लोकसंख्या वितरणाची सर्वाधिक टक्केवारी कोणत्या खंडाची दर्शवली आहे?
2. सर्वांत कमी लोकसंख्या असलेला खंड कोणता?
3. आशिया खंडातील लोकसंख्या वितरणाची टक्केवारी किती आहे?

**प्रश्न 5. टीपा लिहा (कोणतीही एक) : (4)**

1. लोकसंख्या संक्रमण सिद्धांताचा तिसरा टप्पा
2. मासेमारी व्यवसायावर परिणाम करणारे घटक

**प्रश्न 6. (अ) पुढील उताऱ्याचे वाचन करून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा : (4)**

मानवाच्या अमर्याद व्यावसायिक लाभासाठी जगभरात सुरू असलेली बेसुमार लाकूडतोड आणि वन्यजीवांची अवैध शिकार यामुळे निसर्गाचा समतोल अक्षरशः धोक्यात आला आहे. जंगलांमधील मौल्यवान वृक्षांची कत्तल करून कागद व फर्निचर उद्योगासाठी लाकडाची तस्करी केली जात आहे, तर दुसरीकडे चामडे, दात व मांसासाठी मुक्या प्राण्यांची क्रूर शिकार सुरू आहे. या अनियंत्रित व्यवसायामुळे घनदाट अरण्ये नष्ट होऊन जागतिक तापमानवाढ आणि हवामान बदलाचा गंभीर धोका निर्माण झाला आहे. वन्यजीवांचे नैसर्गिक अधिवास उध्वस्त झाल्यामुळे अनेक दुर्मिळ प्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. जंगले कमी झाल्याने मातीची धूप वाढणे आणि पर्जन्यमान चक्र बिघडल्यासारख्या नैसर्गिक आपत्तींना मानवाला तोंड द्यावे लागत आहे. या विनाशास कारणीभूत ठरणाऱ्या अवैध लाकूडतोड व शिकारीवर चाप लावण्यासाठी प्रशासनाने कठोर कायदे करून कडक अंमलबजावणी सुरु आहे परंतु अवैध मार्गाने लाकुडतोड व शिकार करणे अजून पूर्ण पणे थांबलेले नाही.

**प्रश्न :**

1) जागतिक लाकूडतोड आणि शिकारीमागे मानवाचा कोणता मुख्य उद्देश असतो?

2) अनियंत्रित लाकुडतोड व शिकारीमुळे पर्यावरण आणि वन्यजीवांवर कोणता विपरीत परिणाम झाला आहे?

3) परीछेदातील गंभीर समस्येवर नियंत्रण मिळवण्यासाठी काय करणे गरजेचे आहे?

4) लाकूडतोड व शिकारीच्या विनाशास कोणती गोष्ट मुख्यत्वे कारणीभूत ठरत आहे?

**प्रश्न 6. (ब) खालीलपैकी एका घटकाची सुबक आकृती काढून नावे द्या : (2)**

1. वयोरचनेचा विस्तारणारा मनोरा
2. रेषीय वस्ती

**प्रश्न 7. खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा : (8)**

1. लोकसंख्या वितरणावर परिणाम करणारे प्राकृतिक घटक उदाहरणासह स्पष्ट करा.
2. प्राथमिक आर्थिक क्रिया म्हणजे काय हे सांगून प्राथमिक आर्थिक क्रियेचे प्रकार स्पष्ट करा.

Proff Manojj Deshmukh